# गज्ज-विहाओ

## १) मरहट्ठी भासाए गोरवं

मराठी आणि महाराष्ट्री प्राकृत भाषेचा खूप जवळचा संबंध आहे. आज आपण जी मराठी भाषा बोलतो तिचे महाराष्ट्री प्राकृत हे मूळ रूप आहे. या प्राचीनतेमुळेच आपण मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणू शकतो. एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, आपले विचार, मते, कल्पना, भावभावना व्यक्तीसमोर योग्य आणि प्रभावीपणे मांडण्यासाठी त्या भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. या पाठामध्ये याच महाराष्ट्री प्राकृत भाषेची माहिती सांगितली आहे.

महाराष्ट्री प्राकृत भाषा शिकण्यास सोपी असून सर्वांना उपयोगाची आहे असे शिक्षिका विद्यार्थ्यांना सांगत आहेत. प्राचीन काळी महाराष्ट्री प्राकृत भाषा सामान्य लोकांची बोलीभाषा होती. या भाषेमध्ये व्याकरण, कथा, गद्य-पद्यमय चंपू व इतर साहित्यसुद्धा रचले गेले आहे.



**राहिआ–** आअरिआ ! अम्हे मरहट्ठी पाइअभासा सिक्खिउं इच्छामो। किं मरहट्ठी पाइअभासा कढिणा अत्थि ?

**अज्झाविआ–** वच्छे राहिआ! णत्थि णत्थि। मरहट्ठी पाइअभासा अच्चंता सुलहा सरला अ।

**रोहिओ–** आअरिआ! अज्ज मरहट्ठी पाइअभासा ववहारस्स भासा णत्थि, तओ इमाए भासाए अज्झअणस्स किं उवओअं?

**अज्झाविआ–** आहुणिआ मरहट्ठी भासा णाउं सुलहा। आहुणिअ-संतस्स णाणेसरस्स णाणेसरी वि मरहट्ठी पाइअभासाए रइआ एव। जआ तुमं पाईण-मरहट्ठि-भासा णाउं समत्था तआ तुमं लीलाचरिअं, णाणेसरी, रुप्पिणि-चरिअं च णाउं वि समत्थो होसि।

**अणुराहा–** आयरिआ! मरहट्ठी पाइअभासा कस्सिं काले वट्टित्था? किं सा जणभासा होत्था?

**अज्झाविआ–** आम। पाईणे काले मरहट्ठदेसस्स बहुजणाणं जणभासा मरहट्ठी पाइअं एव। 'महा रट्ठो' त्ति मरहट्ठदेसस्स अत्थो। अओ मरहट्ठी पाइअभासा महा-रट्ठस्स भासा आसी। पाईणकाले महा-रट्ठे राअउआणा-मज्झ-पएसाणं समावेसो वि होत्था। अओ मरहट्ठी

भासा पाईणे काले मरहट्ठ-राअउआणा-मज्झपएसाणं जणभासा हूआ।

**पडिमा –** आयरिआ ! मरहट्ठी पाइअभासाए विसिट्ठं किं ?

**अज्झाविआ–** ण सा केवला जणभासा, अवि उ गंथस्स भासा वि अत्थि। जइण-सेअंबरेहिं आअरिएहिं जइण-गंथ-लेहणं मरहट्ठी भासाए एव कअं। अओ सा गंथभासा जइण मरहट्ठी पाइअं णामेण पसिद्धा। तहा य आअरिएहिं हेमचंदेहिं पाइअवागरण-रअणासमए पहाणओ मरहट्ठी पाइअभासाए वागरणं एव णिबद्धं अत्थि।

**राहिआ –** आअरिए ! मरहट्ठी पाइअभासाए पमुहा पसिद्धा अ गंथा के संति ?

**अज्झाविआ–** इमाए भासाए अणेआ पसिद्धा गंथा गंथआरा अ संति। तेसु कइवआणि णामाणि साहेमि, जहा अ- हालसालिवाहणस्स गाहासत्तसई, पवरसेणस्स सेउबंधो, वप्पइराअस्स गउडवहो, कोऊहलस्स लीलावई, रामपाणिवाअस्स कंसवहो तहा अ विमलसूरीणं पउमचरिअमाइं। एए गंथाणं पढणेण अम्हाणं भासा तहा जीवणं उण्णअं होइ। गंथेसु जे अणुभवा णिबद्धा संति ते अम्हाणं जीवणं समिद्धं करेंति।

**रोहिओ –** इमेसु गंथेसु केवलं जइण-तच्चणाणं अक्खिअं किं ?

**अज्झाविआ–** ण छत्ता। इमेसुं गंथेसुं पेमकहा, सुहासिआणि, जुज्झवण्णणं, रामकहा, कण्हकहा अवि वण्णिआ। केवलं तच्चणाणं णत्थि। सव्वाणि गंथाणि णाणवड्ढणं मणोरंजणं च करेंति। गाहासत्तसई तु तक्कालीण-समाअ-सक्किईणं विसालो कोसो एव। वज्जालग्गगंथे विविहविसएसु जीवणोवओगी सुहासिआणि रइआणि कईहिं। तेसिं जणाणं विआरा णाउं एए गंथा अईव महत्तपुण्णा। अओ मरहट्ठी पाइअभासाए अज्झअणं अम्हाणं कए तु बहु आवस्सअं एव।

**सव्वे छत्ता –** अज्झाविए! धण्णवाओ। अहुणा अम्हे सव्वे तुम्हाणं समीवे उवविसिऊण मरहट्ठिं पाइअभासं पढिस्सामो। तुम्हे पाढिस्सह किं ?

**अज्झाविआ–** आम। सव्वे छत्ता कल्ले आगच्छंतु मम समीवे। वयं पाढारंभं करिस्सामो।

## सद्दत्था

**सिक्खिउं** – शिकण्याची
**मरहट्ठी पाइअभासा** – महाराष्ट्री प्राकृत भाषा
**कढिणा अत्थि ?** – कठीण आहे का ?
**अच्चंता सुलहा सरला अ** – अतिशय सोपी आणि सरळ आहे.
**ववहारस्स भासा** – व्यवहाराची भाषा
**किं उवओअं ?** – काय उपयोग ?
**णाउं** – जाणून घेण्यासाठी, समजण्यासाठी
**णाणेसरस्स णाणेसरी** – ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी
**जणभासा** – लोकांची भाषा, बोली भाषा
**राअउआणा-मज्झपएसाणं** – राजपुताना व मध्यप्रदेशांचा
**पाईणे काले** – प्राचीन काळी
**जइण-सेअंबरेहिं आअरिएहिं** – जैन श्वेतांबर आचार्यांनी
**पाइअवागरण-रअणासमए** – प्राकृत व्याकरण लिहित असताना
**णिबद्धं–** रचले आहे
**हालसालिवाहणस्स गाहासत्तसई** – राजा हाल सातवाहनाची गाथासप्तशती
**पवरसेणस्स सेउबंधो** – प्रवरसेनाचे सेतुबंध
**वप्पइराअस्स गउडवहो** – वाक्पतिराजाचे गौडवध
**कोऊहलस्स लीलावई** – कुतूहल/कौतूहल याची लीलावती (कथा)
**रामपाणिवाअस्स कंसवहो** – रामपाणिवाद यांचा कंसवहो
**उण्णअं** – उन्नत/ विकसित
**समिद्धं** – समृद्ध
**जुज्झवण्णणं** – युद्धाचे वर्णन

**तच्चणाणं –** तत्त्वज्ञान (आत्मा व संसार याविषयीचे ज्ञान)
**तक्कालीण-समाअ-सक्किईणं –** त्याकाळातील समाज आणि संस्कृती यांचा
**महत्तपुण्णा –** महत्त्वाचे, महत्त्वपूर्ण
**आम (अव्यय)–** हो, ठीक आहे
**पाढारंभं –** शिकण्यास सुरुवात (करू)

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) राहिआ– आअरिआ ! ...... अज्झअणस्स किं उवओअं ?
२) रोहिओ– इमे गंथा ...... बहु आवस्सअं एव।
३) पडिमा– आअरिआ ! ...... पसिद्धा अ गंथा के संति ?

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्री प्राकृत भाषा कोणत्या प्रदेशाची जनभाषा होती?
२) ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी कोणत्या भाषेत लिहिली आहे?
३) हेमचंद्र यांनी कोणत्या भाषेचे व्याकरण लिहिले आहे?

**३) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांची नावे लिहा.
२) महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांमधील विषय सांगा.
३) 'महाराष्ट्री प्राकृत भाषा जनभाषा होती', स्पष्ट करा.

**४) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्री प्राकृत भाषेची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.
२) महाराष्ट्री प्राकृत भाषा शिकण्याचे महत्त्व तुमच्या शब्दांत मांडा.

**५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) जआ तुमं पाईण-मरहट्ठी भासा णाउं समत्था, तआ तुमं लीलाचरिअं, णाणेसरी, रुप्पिणि-चरिअं च णाउं वि समत्थो होसि ।
२) अओ मरहट्ठी पाइअभासा महा-रट्ठस्स भासा आसी।
३) केवलं तच्चणाणं णत्थि ।

**६) योग्य शब्द निवडून तक्ता पूर्ण करा.**


सिक्खिउं, णाउं, उवविसिऊण, भाविऊण, रइआ, हूआ, होत्था, आसी.

| पूर्वकालवाचक | हेत्वर्थक | कर्म.भू. धा. वि. | भूतकाळ |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**७) जोड्या लावा.**

| गट अ | गट ब |
|---|---|
| १) लीलावई | अ) हालसालिवाहणो |
| २) गाहासत्तसई | ब) विमलसूरी |
| ३) पउमचरिअं | क) वप्पइराओ |
| ४) सेउबंधो | ड) कोऊहलो |
| ५) गउडवहो | इ) पवरसेणो |

**८) पाठातील महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांची नावे लिहून रेखाजाल पूर्ण करा.**




**९) पाठातील महाराष्ट्री प्राकृत ग्रंथाचे विषय निवडून रेखाजाल पूर्ण करा.**

